**Date: 28th Feb 2020.** **Day –Friday** **Paper- Sakal Today** **Page No. 4**

सकाळ

# ‘ट्रिनिटी’च्या शेती वाहनाची चंडीगड स्पर्धेसाठी निवड

**गोकूळनगर, ता. २७ :** येवलेवाडी येथील ट्रिनिटी अभियांत्रिकी विद्यालयातील विद्यार्थ्यांनी शेतीसाठी उपयुक्त असे हलक्या वजनाचे वाहन बनविले असून, या मिनी वाहनाची निवड देशपातळीवर चंडीगड येथे ५ ते ९ मार्च रोजी होणाऱ्या बहा स्पर्धेसाठी झाली आहे.

‘ट्रिनिटी’मधील रवी चौधरी, अपूर्व भांबुरे, फैयाज गिलानी, साकिफ शेख, आकिफ शेख, मनींच पाटील, विजय मेमाणे यांच्यासह एकूण १६ विद्यार्थ्यांनी हे शेती वाहन बनविले असून, या वाहनाचे मुख्य वैशिष्ट्य म्हणजे डिस्क ब्रेक व व्हील हब हे एकाच चाकावर जोडण्यात त्यांना यश आले आहे, तसेच गाडीला ३०५ चे



येवलेवाडी : ट्रिनिटी अभियांत्रिकी विद्यालयातील विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या शेती वाहनासह मान्यवर.

ब्रिक्झॉन हे पेट्रोल इंजिन बसविण्यात आले असून, हे वाहन शेतीमाल घेऊन खड्डेमय रस्ते व शेतातून ताशी ८० किलोमीटर वेगाने धावू शकते. वाहनाचे ॲव्हरेज एक लिटर पेट्रोलमध्ये २२ किलोमीटर असे आहे.

देशातील सर्व महाविद्यालयांतून ३२० वेगवेगळे प्रयोग चंडीगड येथील चित्कारा विद्यापीठात सादर होणार आहेत. त्यासाठी या शेती वाहनाची निवड करण्यात आली आहे. संस्थापक कल्याण जाधव व संचालक विभावरी जाधव, प्राचार्य बी. एम. शिंदे, प्रतिभा चव्हाण आदींच्या उपस्थित वाहनाचे उद्घाटन करण्यात आले.

Pune, HadapsarToday
28/02/2020 Page No. 4